# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 05/04/2023 (बुधवार) सायंकाळ


---

### गैरकायदयाची मंडळी

१) पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत ०.५ कि.मी अंतरावरील प्रभाग क्र. ९ पारशिवनी येथे दिनांक ३/०४/२०२३ चे ११.३० वा. दरम्यान **आरोपी नामे– १) सौ. रुपाली नरेश लोहकरे २) नरेश लोहकरे दोन्ही रा. करंभाड ३) आकाश हरिचंद ४) दिनेश पोटभरे ५) तुकाराम पोटभरे रा. कोराडी** आरोपीतांनी गैरकायद्याची मंडळी तयार करुन यातील फिर्यादी नामे– कोमल एकनाथ बडवाईक वय २९ वर्ष, रा. वार्ड नं. ९ पारशिवनी जि. नागपुर यांचे घराचे आत अनाधीकृतपणे प्रवेश करुन जुने भांडणाचे कारणावरून आरोपींनी हातबुक्कीनी मारपीट केली व आरोपी क्र. ४ याने आपले हातातील कडयाने फिर्यादीचे डावे भोवईवर मारुन व आरोपी क्र. ५ याने फिर्यादीचे उजवे हाताचे पहीले बोटाला दातांनी चावा घेवुन जखमी केले. फिर्यादीचे आई वडील यांना सुध्दा हातबुक्कीने मारले शिवीगाळ करून पुन्हा मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीतांविरुध्द कलम १४३, १४७, १४९, ४५२, ३२४, ३२३, ५०४, ५०६ भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा गजानन उके बोन्द्र ब. नं. 1089 मो. क्र. 9881241089 हे करीत आहे.

२) पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत ०.५ कि.मी अंतरावरील प्रभाग क्र. ९ पारशिवनी येथे दिनांक ३/०४/२०२३ चे २३.३० वा. दरम्यान **आरोपी नामे– १) कोमल एकनाथ बडवाईक २) एकनाथ लक्ष्मण बडवाईक ३) सौ. सुलोचना एकनाथ बडवाईक ४) राजु भैयाजी बडवाईक ५) सौ. दिपाली राजु बडवाईक सर्व रा. पारशिवनी** आरोपीतांनी गैरकायद्याची मंडळी तयार करुन जुने भांडणाचे कारणावरून यातील फिर्यादी नामे– सौ रूपाली नरेश लोहकरे वय २९, रा. करंभाड पारशिवनी जि. नागपुर व फिर्यादीचे पती नामे– नरेश लोहकरे तसेच मोठे वडील तुकाराम पोटभरे व चुलत भाऊ दिनेश पोटभरे यांना हातबुक्कीनी मारपीट केली व आरोपी क्र. १ व ४ यांनी हातात काठी घेवुन फिर्यादीचे पती नरेश लोहकरे तसेच मोठे वडील तुकाराम पोटभरे व चुलत भाऊ दिनेश पोटभरे यांना मारून जखमी केले व शिवीगाळ करून पुन्हा मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीतांविरुध्द कलम १४३, १४७, १४९, ३२४, ३२३, ५०४, ५०६ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा गजानन उके बोन्द्रें ब. नं. १०८९ मो. क्र. ९८८१२४१०८९ हे करीत आहे.

# <u>अकस्मात मृत्यू</u>

**पो.स्टे. कळमेश्वर :–** अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा वरोडा येथे दिनांक ०३/४/२०२३ चे ०६/०० वा. ते दिनांक ०४/४/२०२३ चे १६/३० वा. दरम्यान फिर्यादीची आजी **मृतक नामे– झिंगुंबाई मानिकराव सलामे वय ८० वर्ष रा. ब्राम्हणी ही** वेडसर असल्याने ती न सांगता घरून निघुन गेली होती करीता पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे हरविल्याबाबची तक्रार दिली. वरोडा येथील पोलीस पाटील यांनी फोन द्वारे माहीती दिली की वरोडा येथील नदीचे पाण्यात एक म्हातारी स्त्री पाण्यात बुडुन मरण पावली आहे असे सांगितल्यावरून फिर्यादी हे त्यांचे मामा अनिल भुसारी यांचे सह वरोडा येथे जावुन पाहीले असता त्यांनी ओळखुन सांगितले की ती त्यांची आजी झिंगुबाई मानिकराव सलामे वय ८० वर्ष रा. ब्राम्हणी ही नदीचे पाण्यात बुडुन पावल्याचे दिसुन आली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– निकेश फुलचंद वाढिवे वय २९ वर्ष रा. ब्राम्हणी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पो.हवा/१६७८ भुक्ते पोस्टे कळमेश्वर हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**